# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक ३०९/२०२४** **दिनांक- १७/०८/२०२४.**

## "गंभीर गुन्हयातील आरोपीतास ०२ दिवसात अटक करण्यात नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४५८/२०२४ भा.द.वि कलम ३५१ (२) सह पोक्सो कायदा कलम-४, ६, ८, १२ प्रमाणे दि. १४/०८/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी नामे रेणु अभिषेक त्रिपाठी, व्यवसाय-गृहिणी रा. रुम नंबर ४०१, ओम श्री कृष्णलीला बिल्डींग, इंद्रलोक, फेज-०२, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे यांचा ११ वर्षांचा मुलगा याला त्याचा मित्र अजित सिंग, याने त्याचे मित्राचे रुममध्ये नेवून त्याचे लिंग पिडीत याचे शौच करावयाचे जागेत टाकण्याचा प्रयत्न केलेबाबत फिर्यादी यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदरचा गुन्हा हा लहान मुलांच्या संदर्भातील गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. वरिष्ठांनी सदर गुन्हयाच्या तपासाचे अनुषंगाने सुचना देवुन नमुद गुन्हा लवकरात-लवकर उघडकीस आणण्याबाबत सुचित केले होते. त्यानंतर सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन सदर गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देण्यात आली तसेच गुन्हा करणारा आरोपी याचा मोबाईल नंबरचे सीडीआर/एसडीआर प्राप्त करुन त्याचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपी अजित प्रमोद सिंर्गे, रा. रुम नंबर १०१, स्वप्नलोक बिल्डींग, इंद्रलोक फेज-१, भाईंदर पुर्व येथुन ताब्यात घेवुन व पोलीस ठाणेस आणुन त्याचाकडे तपास केला असता, त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउनि संजय/लोखंडेमाळी करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अशोक कांबळे, सपोनि/अमोल तळेकर, पोउनि-ज्ञानेश्वर आसबे, पोउनि/संजय लोखंडेमाळी पोहवा/भुषण पाटील, संतोष पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पोशि/ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, संकेत मगर, अस्वर, पवार तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

**-------------0000-------------**